शब्दांना सत्याची धार

प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

HAPPY New Year 2026

मुंबई ● गुरुवार, १ जानेवारी २०२६

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक ८४ ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

नववर्ष मौल्यवान ठरवूया...

तसं तर अगदी सोप्पं आहे.

नवं कॅलेंडर भिंतीला टांगलं आणि जिथे तारीख लिहायची वेळ येईल, तिथे आठवणीने वर्षाच्या जागी '२०२६' लिहिलं, की झालं. आलो आपण नववर्षात. जोडलं आणखी एक वर्ष आपल्या आयुष्याशी.

जगलेल्या क्षणांचा इतिहास करत, तो क्षण यापुढे फक्त स्मरणरंजनासाठी ठेवून काळ गेला पुढे. तो धावतोच आहे. कधीच कोणाच्या हाती लागणार नाही तो. आपल्यालाच धावायचंय त्याच्याबरोबर... त्यानेच आपल्याला पुढे पुढे ढकलत जगण्यासाठी मजबूर करू नये किंवा फरपटत, ओढत नेऊ नये, असं वाटत असेल तर...

आज नववर्षाच्या पहिल्या सूर्योदयाला एवढी जाणीव ठेवली तरी हे नववर्ष हसत हसत आपला हात घेईल हातात. फार काही लागत नाही त्याला. काळाचं स्मरण ठेवा, भान ठेवा आणि मानही ठेवा एवढंच सांगत असतं ते कानात. वर्षभर.

खूप जणांचा प्रश्न असतो, नववर्ष म्हणजे असं काय मोठं असतं;? काय फरक असतो गेल्या आणि येणाऱ्या दिवसांत? खरं आहे. फरक दिवसांत नसतोच. आपण दिवस कसे जगलो, त्यात असतो. आयुष्यातले यापूर्वीचे दिवसही येणाऱ्या दिवसांसारखेच होते. पण, आपल्या प्रत्येकासाठी ते वेगवेगळे होते. आयुष्याचा कडू-गोड आठवणींचा पट त्यानेच तर विणला आहे ना.

जे गेलं ते जाऊ द्या. जे येतं आहे, त्याचा विचार करा. हे नववर्ष अधिक सुंदर, चिरस्मरणीय, सगळ्या विश्वासाठी लाभदायी कसं होईल, यासाठी हे वर्ष देईल त्यातला प्रत्येक दिवस कारणी लावूया.

प्रारंभाच्या एका दिवसाच्या जल्लोषाचे, पार्ट्या आणि फटाक्यांनी, इकडून तिकडे सरकवलेल्या मेसेजनी काय होणार? उद्या सगळंच 'डिलीट' होणार. त्यापेक्षा अधिक स्थायी, अधिक शाश्वत आणि निर्मळ आनंदाचा शोध घेता आला तर? वर्ष २०२६ त्याने मौल्यवान ठरवूया. 'प्रहार परिवारा'च्या वतीने त्यासाठीच तुम्हां सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

अलविदा २०२५, वेलकम २०२६...

२०२५ सालच्या शेवटच्या दिवशी थर्टी फर्स्टच्या मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्यासाठी व २०२५ सालाला अलविदा करण्यासाठी मरिन ड्राईव्ह येथील समुद्र किनारी युवकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. मावळत्या सूर्यासोबत आपली सेल्फी काढण्यासाठी तरुणाईंमध्ये जणू काही स्पर्धाच लागली होती. सकाळपर्यंत थांबून उगवत्या सूर्याला नमस्कार करूनच नववर्षाचे स्वागत केल्यावरच घरी परतण्याचा मानस यावेळी अनेक युवकांनी व्यक्त केला. (छाया : अरुण पाटील)

मतदानापूर्वीच राज्यात भाजपच्या बिनविरोध नगरसेवकांचा षट्कार!

कल्याणमध्ये तीन, धुळ्यात दोन, तर पनवेलमध्ये एक विजयी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भाजपने महायुतीच्या विजयाचा शुभारंभ केला. येथील प्रभाग क्र. १८ मधून रेखाताई चौधरी आणि प्रभाग क्र.२६-क मधून आसावरीताई केदार नवरे यांची नगरसेविकपदी बिनविरोध निवड झाली. या विजयानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दोन्हीही विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. यावेळी, चव्हाण यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून दोन्ही महिला उमेदवारांचे बोलणे करून दिले.

कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीतील प्रभाग क्रमांक २६ ब मधून भाजपच्या रंजना मीतेश पेणकर बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे, भाजपने येथील महापालिकेत विजयाची हॅटट्रिक केली असून स्वबळावरील विजयासाठी किंवा सत्ता स्थापनेसाठी भाजप केवळ ५७ जागा दूर आहे. १२२ जागा असलेल्या केडीएमसी महापालिकेत भाजप ६५ आणि शिवसेना ५७ जागांवर निवडणूक लढवत आहे. त्यामुळे, भाजप-शिवसेना युतीच्या एकूण १२२ जागांपैकी भाजपने तीन जागा जिंकत आघाडी घेतली आहे. पनवेल महापालिकेतही भाजपने खाते उघडले असून भाजपचे नितीन पाटील बिनविरोध निवडून आले आहेत.

मुंबईत महायुतीला मतदानापूर्वीच धक्के

कागदपत्रांची पूर्तता न केल्याने प्रभाग क्रमांक २११ मधील शिवसेनेच्या उमेदवाराचा अर्ज फेटाळला गेला आहे. प्रभाग क्रमांक २१२ मध्ये भाजपच्या मंदाकिनी खामकर यांचा अर्जही बाद झाला आहे. खामकर या एबी फॉर्म मिळाल्यावर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक कार्यालयात उशिरा पोहोचल्या. त्यांना १५ मिनिटे विलंब झाला. त्यामुळे त्यांचा अर्ज बाद झाला.

उबाठा गटाचे पाच उमेदवार 'डिजिटल'मुळे अडचणीत

मालाड पूर्वेतील ईशान्य विभागातील निवडणूक कार्यालयात अर्जांची छाननी करण्यात येत आहे. शिवसेनेने ठाकरे गटाच्या पाच उमेदवारांच्या अर्जावर आक्षेप घेतला आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक ३८, ३९, ४०, ४१ आणि ४२ मध्ये ठाकरे गटाच्या उमेदवारांचे अर्ज धोक्यात येण्याची दाट शक्यता आहे. शिवसेना उबाठाच्या उमेदवारांच्या एबी फॉर्मवर डिजिटल स्वाक्षरी सही असल्याचे लक्षात आले आहे. त्यावर शिवसेनेचे विभागप्रमुख वैभव भरडकर यांनी आक्षेप घेतला आहे. यासाठी निवडणूक आयोगाच्या कायद्यावर बोट ठेवण्यात आले आहे. पक्षाच्या एबी फॉर्मवर प्रत्यक्ष स्वाक्षरी गरजेची असते. डिजिटल स्वाक्षरीमुळे ठाकरेंच्या उमेदवारांचे अर्ज बाद होऊ शकतात.

धुळ्यातही खाते उघडले : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष असलेले रणजित राजे भोसले यांनी काल पक्षाचा राजीनामा देत शेवटच्या क्षणी भाजपात प्रवेश केला होता आणि त्यांच्या धर्मपत्नी उज्ज्वला भोसले यांना भाजपचे तिकीट मिळवले होते. धुळे महापालिका निवडणुकीच्या अर्ज छाननी दरम्यान त्यांच्याविरोधात असलेल्या चारही उमेदवारांचे नामांकन अर्ज बाद झाल्याने त्या बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्याचबरोबर प्रभाग क्रमांक ६ ब मधून ज्योत्स्ना पाटील याही विजयी झाल्या आहेत.

मंत्रिमंडळ बैठकीला मंत्री, अधिकारीच गैरहजर

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

ऐन महापालिका निवडणुकीच्या धावपळीत आणि वर्ष अखेरच्या दिवशी, बुधवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. पण, या बैठकीला खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक कॅबिनेट मंत्र्यांनी दांडी मारली. शिवाय अनेक अधिकारी वर्षअखेरचा मुहूर्त साधून पर्यटनासाठी गेल्यामुळे बहुतांश अधिकाऱ्यांनीही दांडी मारली होती. सर्व दांडीबाहद्दर अधिकारी सुट्टीवर दिसतात, असे म्हणत कमी उपस्थितीवर मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून नाराजी व्यक्त

मंत्रालयात शुकशुकाट

बैठकीला जेमतेम १४-१५ मंत्रीच हजर

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. मंगळवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक राजकीय नेत्यांची धावपळ उडाली होती. कॅबिनेट मंत्र्यांसह, राज्यमंत्री आणि अन्य लोकप्रतिनिधींना पक्षाचे एबी फॉर्म दिलेल्यांना अर्ज भरण्यासाठी वेळेत कार्यालयात पाठविण्यासाठी, उमेदवारी नाकारलेल्यांची समजूत काढण्यासाठी प्रचंड धावपळ करावी लागली. नाराजांच्या रोषाला सामोर जाण्याचे प्रकार तर अनेक ठिकाणी घडले.

राजकीय नेते, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींची मंत्रालयाकडे पाठ

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात राज्यभरातील राजकीय नेते, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींची गर्दी असते. पण, महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे राजकीय नेते, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी व्यस्त असल्यामुळे त्यांनीही मुंबईकडे पाठ फिरवली. बैठकीनंतर गाठीभेठी घेण्यासाठी चढाओढ असते. पण, बुधवारी मंत्रालयात शुकशुकाट होता.

बुधवारी झालेल्या बैठकीकडे महापालिकांच्या धापवळीत असलेल्या कॅबिनेट बैठकीकडे पाठ फिरवली. खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही बैठकीला नव्हते.

'गिग वर्कर्स'च्या संपासमोर 'झोमॅटो, स्विगी' झुकले!

मुंबई : नववर्षाच्या पूर्वसंध्येस 'झोमॅटो-स्विगी' या फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मनी मोठा निर्णय घेतला आहे. देशभरातील 'गिग वर्कर्स'नी ऐन न्यू इयरच्या तोंडावर संप पुकारला होता. त्यामुळे स्विगी अन् झोमॅटोसमोर मोठा पेच निर्माण झाला होता. त्यात थर्टी फस्ट नाईट म्हणजे या दोन्ही कंपन्यांसाठी सर्वाधिक कमाई करण्याची मोठी संधी असते, अशावेळी या संपामुळे मोठा फटका बसणार होता. त्यामुळे या दोघांनीही त्यांच्या डिलिव्हरी पार्टनर्सच्या इन्सेंटीव्ह अन् पेमेंटमध्ये वाढ केली आहे.

एनआयएप्रमुख सदानंद दाते महाराष्ट्राचे नवे पोलीस महासंचालक

शनिवारी स्वीकारणार पदभार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्र पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त होणार आहेत. राज्याच्या गृह विभागाने त्यासाठी सात ज्येष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) प्रमुख सदानंद दाते यांचे नाव यात प्रामुख्याने चर्चेत होते.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने सातपैकी तीन नावांची निवड करून ती राज्य सरकारकडे पाठवली होती. त्यातून पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी अजमल कसाब आणि अबू इस्माइल यांच्याशी दोन हात करणाऱ्या सदानंत दाते यांच्या नियुक्तीवर आज शिक्कामोर्तब करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक भारतीय पोलीस सेवा रश्मी शुक्ला यांचा 'महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक' म्हणून कार्यकाळ ३ जानेवारीला २०२६ रोजी संपत आहे. त्यानंतर सदानंद दाते पदभार स्वीकारतील. त्यांचा कालावधी दोन वर्षांचा असेल.

'जर्मन बेकरी'प्रकरणातील आरोपी बंटी जहागिरदारचा गोळीबारात मृत्यू

◆ श्रीरामपूर (प्रतिनिधी) :

पुण्यातील गाजलेल्या जर्मन बेकरी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी अस्लम शेख उर्फ बंटी जहागिरदार याच्यावर बुधवारी भरदिवसा झालेल्या गोळीबाराच्या घटनेने संपूर्ण श्रीरामपूर शहरात एकच खळबळ उडाली आहे. दुपारी सुमारे पावणेतीन वाजण्याच्या सुमारास ही थरारक घटना घडली असून, शहरातील कॉलेज रोड परिसरात दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी बंटी जहागिरदारावर गोळीबार केला. या हल्ल्यात बंटी जहागिरदार गंभीर जखमी झाल्याने त्याला तातडीने श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती अधिक गंभीर झाल्याने त्यास पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला आहे.

बंटी जहागिरदार कॉलेज रोडने दुचाकीवरून जात असताना अचानक दोन अज्ञात इसमांनी जवळ येत त्याच्यावर गोळीबार केला. काही सेकंदातच हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, अनेक दुकाने तातडीने बंद करण्यात आली. अस्लम शेख हे नाव २०१० साली पुण्यात झालेल्या जर्मन बेकरी बॉम्बस्फोट प्रकरणात चर्चेत आले होते. या प्रकरणातील तो प्रमुख आरोपींपैकी एक होता. दीर्घ काळ तुरुंगवासानंतर त्याला २०२३ मध्ये जामीन मंजूर झाला होता. जामिनावर बाहेर आल्यानंतर तो श्रीरामपूर परिसरात राहत असल्याची माहिती आहे.

या पार्श्वभूमीवर झालेला हा हल्ला केवळ वैयक्तिक वादातून झाला की यामागे काही मोठा कट आहे, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच रुग्णालयाबाहेर मोठी गर्दी जमली. आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी या मागणीसाठी काही समर्थक व नागरिकांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन केले. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जमावाला शांत राहण्याचे आवाहन करत, शहरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

संवेदनशील ठिकाणी पोलीस गस्त वाढविण्यात आली असून, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. या घटनेनंतर पोलिसांनी विशेष पथके तयार करून हल्लेखोरांचा शोध सुरू केला आहे. हल्लेखोर कोण होते, त्यांनी कोणत्या दिशेने पलायन केले, तसेच हल्ल्यामागील नेमके कारण काय याचा सखोल तपास सुरू आहे.

सध्या श्रीरामपूर शहरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, संशयित हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

दूषित पाण्यामुळे इंदूरमध्ये ८ जणांचा मृत्यू

◆ इंदूर (प्रतिनिधी) :

देशातील सर्वात स्वच्छ शहरांपैकी एक असलेल्या इंदूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. गेल्या काही दिवसांपासून दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर या दूषित पाण्यामुळे ११०० हून अधिक लोकांना पोटदुखी आणि उलट्या-जुलाबांचा त्रास होत आहे. इंदूर शहरामध्ये नर्मदा नदीमधून येणारे पाणी हे आजार आणि मृत्यूचे कारण ठरत असल्याचे समोर आले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेने प्रभावित भागातील पाणीपुरवठा बंद केला आहे. जलवाहिनीची दुरुस्ती केली जात असून, टँकरमधून स्वच्छ पाणी पुरवले जात आहे. आरोग्य विभागाची पथके घरोघरी जाऊन रुग्णांची तपासणी करत आहे.

दूषित पाणीपुरवठ्यामुळे ही घटना घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिकेने त्वरित तपास सुरू केला. त्यानंतर भागिरथपुरा पोलीस चौकीच्या टॉयलेटखालून जाणाऱ्या नर्मदेच्या जलवाहिनीला गळती लागली होती. या गळतीमुळे दूषित पाणी जलवाहिनीमध्ये मिसळत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संपूर्ण प्रभागात दूषित पाण्याचा पुरवठा होत होता. हे दूषित पाणी पिऊन लोक आजारी पडत होते. दूषित पाण्याचे प्राशन केल्याने तब्येत बिघडून आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याने इंदूरमधील भागिरथपूरामध्ये खळबळ उडाली आहे.

११०० हून अधिक लोकांना पोटदुखी आणि उलट्या-जुलाबांचा त्रास

गेल्या काही दिवसांपासून नर्मदा नदीच्या पाण्याचा वापर करू नका, असे आवाहन करणाऱ्या पोस्ट येथील सोशल मीडियावरून लोक शेअर करत होते. मात्र लोकांच्या तक्रारींकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने दुर्लक्ष केले.

भारत-पाकिस्तान संघर्षात मध्यस्थीचा आणखी एकाचा दावा!

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

चीनचा दावा भारताने फेटाळला

जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील तहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष पेटला होता. हा संघर्ष संपवण्यात मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. मात्र भारताने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला.

चीननेही आपण भारत व पाकिस्तान यांच्यात या संघर्षाच्या काळात मध्यस्थी केल्याचा दावा केला आहे. भारताने चीनचाही दावा फेटाळून लावताना शस्त्रविरामाच्या निर्णयामध्ये तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप नव्हता, असे स्पष्ट केले आहे.

ऑपरेशन सिंदूर नंतर १० मे रोजी दोन्ही देशांच्या डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्समध्ये थेट चर्चा झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम जाहीर करण्यात आला, असे भारताकडून वारंवार सांगण्यात आले आहे. आम्ही यापूर्वीच असे दावे फेटाळले आहेत. भारत व पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय मुद्द्यावर तिसऱ्या पक्षाची कसलीही भूमिका नाही. दोन देशांच्या डीजीएमओमध्ये झालेल्या थेट चर्चेनंतर शस्त्रविरामावर एकमत झाले, ही भूमिका यापूर्वीही अनेकदा स्पष्ट करण्यात आलेली आहे.

चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्याप्रमाणे चीनने मे महिन्यात झालेल्या भारत-पाकिस्तान संघर्षास अनेक जागतिक संघर्षामध्ये मध्यस्थी केल्याचा दावा केल्यानंतर यावर भारताकडून ही प्रतिक्रिया देण्यात आली आहे. पाकिस्तान आणि भारत यांच्यातील तणावात मध्यस्थी केली, असा दावा चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी केला आहे. दरम्यान, भारत-पाकिस्तान युद्धबंदीसाठी तिसऱ्या पक्षाच्या हस्तक्षेपाला भारताने वारंवार नकार देत या संदर्भातील सर्वच दावे फेटाळून लावलेले आहेत.

मुंबईसह महानगरांत ११, १२ आणि १३ जानेवारीला महायुतीच्या सभांचा धडाका

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशभरातून स्टार प्रचारक येणार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मिनी विधानसभा समजल्या जाणाऱ्या महापालिकांची निवडणूक ही भाजप-महायुतीसाठी प्रतिष्ठेची, तर ठाकरे बंधूंसाठी अस्तित्वाची लढाई आहे. त्यामुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख महानगरपालिकांमध्ये महायुतीने विजय मिळवण्यासाठी आपली पूर्ण ताकद पणाला लावली आहे. याचाच भाग म्हणून ११, १२ आणि १३ जानेवारी या तीन दिवसांत मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर या प्रमुख शहरांमध्ये महायुतीच्या जाहीर सभांचा धडाका पाहायला मिळणार आहे.

या सभांना पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजपच्या इतर राज्यांतील मुख्यमंत्री व स्टार प्रचारकांची उपस्थिती असणार आहे.

पंतप्रधान मोदी ११ जानेवारीला मुंबईत दाखल होणार असून, त्यांच्या हस्ते पद्मभूषण पुरस्कार प्राप्त आचार्य श्री. रत्नसुंदरसुरीश्वरजी महाराज यांनी लिहिलेल्या ५००व्या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने जैन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न महायुतीकडून केला जाणार आहे.

महानगरात प्रचाराचा मास्टर प्लान

महायुतीने मुंबई महानगरातील उत्तर भारतीय मतदारांची संख्या लक्षात घेऊन विशेष रणनीती आखली आहे. यासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह भोजपुरी अभिनेते मनोज तिवारी, रवी किशन, मैथिली ठाकूर, गायक निरहुआ यांसारख्या स्टार प्रचारकांची फौज मैदानात उतरवली जाणार आहे. या स्टार प्रचारकांना मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात पाचारण करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस १० दिवसांत ४० सभा घेणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आगामी १० दिवसांत तब्बल ४० ते ४५ प्रचार सभा घेणार आहेत. प्रत्येक महापालिकेसाठी वेगळे नियोजन करण्यात आले असून, मोठ्या महापालिकांमध्ये (मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर) तीन ते चार सभांचे आयोजन केले जाणार आहे. छोट्या महापालिकांमध्ये प्रत्येकी एक सभा होईल. दिवसाला सरासरी ४ सभांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही मुख्यमंत्र्यांनी मोठ्या प्रमाणात सभा घेतल्या होत्या आणि आता महापालिका निवडणुकांमध्येही तेच चित्र दिसणार आहे.

उमेदवारांअभावी 'वंचित'कडून काँग्रेसला १६ जागा परत !

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

राज्याचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधू एकत्र आले असून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानेही युतीत सहभाग घेतला आहे. शिवसेना-भाजप युती असून अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्र लढत आहे. येथे काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला सोबत घेतले असून आठवलेंचा रिपाइं आणि समाजवादी पक्षही मैदानात आहे. मुंबई पालिकेसाठी अर्ज भरण्याची शेवटची मुदत ३० डिसेंबर रोजी संपुष्टात आली. त्यामुळे, शेवटच्या दिवशी नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. त्यामध्ये, काँग्रेससोबत आघाडी केल्यानंतर ६२ जागा घेतलेल्या वंचित बहुजन आघाडीने २१ प्रभागांत २१ उमेदवार दिले नसल्याचे शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम यांनी म्हटले होते. २१ नसून १६ जागांवर वंचित उमेदवार देऊ शकले नाही, असेही वंचिकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीला मुंबईमध्ये ६२ जागा दिल्या व जेव्हा अर्ज भरायला २४ तास राहिले, तेव्हा वंचित बहुजन आघाडीने सांगितले की, आमच्याकडे २१ ठिकाणी उमेदवारच नाहीत. त्या २१ प्रभागाची यादी मी ट्वीट केली आहे, आता काँग्रेसच्या समोर प्रश्न उभा राहिला की आता हे २१ उमेदवार आम्ही कुठून आणायचे. त्यामुळे काँग्रेससुद्धा या २१ ठिकाणी आपले उमेदवार उभे करू शकली नाही. आता यामध्ये २१ ठिकाणी भाजपचे उमेदवार आहेत, कारण संख्या त्यांची जास्त आहे. १३७ ठिकाणी ते निवडणूक लढवत आहेत, तर ९० ठिकाणी आम्ही निवडणूक लढवतोय, अशी माहिती संजय निरुपम यांनी दिली.

मुंबईत आम्ही २१ नाही, तर १६ ठिकाणी उमेदवार देऊ शकलो नाही. ५ उमेदवार आम्ही दिले, १६ जागा आम्ही काँग्रेसला परत केल्या आहेत. मध्यरात्री अडीचच्या दरम्यान आम्हाला लक्षात आले की, २१ ठिकाणी आम्ही उमेदवार देऊ शकलो नाही. मात्र, सकाळपर्यंत ५ उमेदवार आल्यामुळे आम्ही १६ ठिकाणी उमेदवार नाही देऊ शकलो, असे वंचित बहुजन आघाडीचे सिद्धार्थ मोकळे यांनी सांगितले.